महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाकरिता रु. ९०१९.५५ लाख वाढीव प्रकल्प आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः बासप्र-०९१७/प्र.क्र.१७३/२१-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २३ जानेवारी, २०१८

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः बासप्र-२००८/प्र.क्र.४५/२१-स, दिनांक ०९.०५.२०११.
२) जागतीक बँकेचा ई-मेल दि. २८.०९.२०१६
३) जागतीक बँकेचे दि. २७.०७.२०१७ रोजीचे पत्र.
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक कृपमं-१११६/प्र.क्र.२०९/२१-स, दिनांक ३१.०१.२०१७
५) दि. ०३.०७.२०१७ रोजी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेली सुकाणू समितीची बैठकीचे इतिवृत्त.
६) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, यांचे पत्र क्र.एमएसीपी/पीसीयु/लेखा/प्रकल्प आराखडा/८१९/२०१७-१८, दि.२२.०८.२०१७

<u>प्रस्तावना -</u>

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प जागतिक बँक सहाय्यित प्रकल्प असून, सदर्भ क्र. १ येथील दिनांक ०९.०५.२०११ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाचा मुळ कालावधी २० डिसेंबर, २०१० ते ३१ डिसेंबर, २०१६ असा होता. संदर्भ क्र. २ येथील दिनांक २८.०९.२०१६ च्या जागतीक बँकेच्या ई-मेल संदेशाद्वारे कळविल्यानुसार सदर प्रकल्पाचा कालावधी २ जानेवारी, २०१८ पर्यंत वाढविण्यात (Extension) आला होता. तसेच संदर्भ क्र. ३ येथील जागतीक बँकेच्या दिनांक २७.०७.२०१७ च्या पत्रानुसार सदर प्रकल्पाचा कालावधी ३१ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत वाढविण्यात (Extension) आला आहे. संदर्भ १ च्या शासन निर्णयानुसार, प्रकल्प किंमत रक्कम रु. ७०८.२० कोटी असून त्यामध्ये जागतिक बँकेचा हिस्सा रक्कम रु. ४६४.३० कोटी, राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु. ५२.०५ कोटी व लाभार्थी हिस्सा रक्कम रु. १९१.८५ कोटी इतका आहे. तसेच संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये रु.

२५.२९ कोटी रकमेच्या वाढीव आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जागतिक बँकेचा व राज्य शासनाचा हिस्सा एकूण रक्कम रु. ५४१.६४ कोटी इतका आहे.

प्रकल्पाच्या उपक्रमांची अंमलबजावणी करताना, आवश्यकतेनुसार उपक्रमांच्या स्वरुपामध्ये जागतिक बँक व राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी बदल झाला आहे. त्यानुसार, काही उपक्रमांच्या भौतिक उद्दीष्टांमध्ये वाढ झालेली आहे. तर काही उपक्रमांच्या प्रती घटाकच्या किंमतीत झालेली वाढ, तसेच प्रकल्प कालमर्यादेमध्ये दहा महिन्याची वाढ झाली आहे. यामुळे जागतिक बँक व राज्य शासन यांच्या एकत्रित हिश्यामध्ये मुळ आराखड्यापेक्षा काही उपक्रमांमध्ये वाढ संभवते. सदरची वाढ ही प्रामुख्याने कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा - सेवा पुरवठादार व माहिती पुस्तिकांचे प्रकाशन, अंतर्गत व बाह्य लेखापरिक्षण - सेवा पुरवठादार, संनियंत्रण व मूल्यमापन सेवा पुरवठादार, पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन, कम्युनिकेशन स्ट्रॅटेजी, कृषि माहिती विश्लेषण सेवा, वेतन व कार्यालयीन खर्च (परदेश दौरा सहीत), बाजार समितीसाठी धान्य चाळणी यंत्र, आठवडी बाजार आधुनिकीकरण व पायाभूत सुविधा - टप्पा १, आठवडी बाजारातील पर्यावरणाचे संवर्धन, वखार पावती विकास योजना, संगणकीकृत लिलाव पध्दती राबविणे, इलेक्ट्रॉनिक वजन काटे- कॅस प्रणालीला जोडणे, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामध्ये आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापना, समान लेखा पध्दतीसाठी सेवा पुरवठादार, कृषि उत्पन्न बाजार समितींमध्ये घन कचरा व्यवस्थापन पध्दती, पिक प्रात्यक्षिक - पीपीपी, कृषि उद्योजकाता विकास कार्यक्रम (ई.डी.पी), काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रात्यक्षिके (पीएचटी), अभ्यास दौरे (राज्यांतर्गत व राज्य बाहेर), खरेदीदार विक्रेता संम्मेलन - जिल्हास्तर, शेतकरी उत्पादक कंपन्या - टप्पा २, एफ.सी.एस.सी. सेवा पुरवठादार, प्रशिक्षण कार्यक्रम डब्ल्यु.एच.आर.योजना, प्रशिक्षण साहित्य व मटेरीयल, वनामती, प्रशिक्षण राज्यस्तरीय कार्यशाळा, डॉक्युमेंनटेशन, प्रसिध्दी, प्रोत्साहन पारितोषीक इ. प्रमुख उपक्रमांवर अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रमाणे वाढ झाल्यामुळे जागतीक बँकेकडून विनिमय दरातील फरकामूळे भारतीय रूपयामध्ये रक्कम रुपये १०७.२६ कोटी उपलब्ध होऊ शकतात. जागतिक बँकेचा हिस्सा ९० टक्के आहे. म्हणजेच त्या प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा १० टक्के रक्कम रू.११.९२ कोटी होत आहे. त्यानुषंगाने जागतिक बँकेचा व राज्य शासनाचा हिस्सा एकूण रक्कम रू.११९.१८ कोटी इतका होत आहे. यापैकी प्रकल्पाची मागणी जागतिक बँकेच्या हिश्याकरीता रक्कम रू.८१.१८ कोटी व राज्य शासनाच्या हिश्याकरीता रक्कम रू.९.०२ कोटी असे एकूण रक्कम रू.९०.२० कोटी इतकी आहे. त्याअनूषंगाने सदर सुकाणु समितीच्या बैठकीचे इतिवृत्तानुसार विषय क्र. ३ नुसार प्रकल्प वाढीव कालमर्यादेत म्हणजेच ३१/१०/२०१८ पर्यत प्रकल्पास विनिमय दरातील फरकामूळे उपलब्ध होणाऱ्या निधीचा आवश्यकतेप्रमाणे वापर करुन वाढीव प्रकल्प आराखडा रु. ९०.२० कोटींस (जागतीक बँकेचा हिस्सा रक्कम रुपये ८१.१८ कोटी व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रुपये ९.०२ कोटी) वित्त विभागाची सहमती मिळविण्याच्या पूर्व अटीवर मान्यता दिली आहे. म्हणून महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाकरीता मंजूर असलेल्या आराखड्यापेक्षा रु. ९०१९.५५ लाख रकमेच्या वाढीव प्रकल्प आराखड्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

जागतीक बँक सहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाकरीता रु. ९०१९.५५ लाख वाढीव रकमेच्या खालील आराखड्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र	घटक	मागणी रक्कम	शेरा
	प्रकल्प समन्वय कक्ष		
१	कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा - सेवा पुरवठादार व माहिती पुस्तिकांचे प्रकाशन	३१२.५०	सेवा पुरवठादारांची देयके व माहिती पुस्तिकांचे प्रकाशनाकरीता रक्कम प्रस्तावित
२	अंतर्गत व बाह्य लेखापरिक्षण - सेवा पुरवठादार	४३.३४	अंतर्गत व बाह्य लेखापरिक्षण - सेवा पुरवठादारांना प्रदान करावयाची रक्कम
३	संनियंत्रण व मूल्यमापन सेवा पुरवठादार	१५६.२५	सेवा पुरवठादारास दयावयाची रक्कम
४	पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन	५७.९२	प्रशिक्षणे, कार्यशाळा, अभ्यास दौर या करीता तसेच सेवा पुरवठादार यांना द्यावयाची देयकाची रक्कम
५	कम्युनिकेशन स्टॅटर्जीज	४०.००	पर्यायी बाजार व्यवस्था, २० जिल्ह्यातील आठवडी बाजार यांची प्रसिध्दी व प्रकल्पाच्या जाहिराती करण्याकरीता तसेच शेती विषयक प्रदर्शनांमध्ये सहभाग या करीता प्रस्तावित
६	कृषि माहिती विश्लेषण सेवा	१२१.००	कृषि माहिती विश्लेषण सेवा या घटकांतर्गत सल्लागार यांची सल्ला फी, सॉफ्टवेअर शुल्क तसेच इतर अनुषंगीक प्रदाने.
७	वेतन व कार्यालयीन खर्च (परदेश दौरा सहीत)	२५६.६७	प्रकल्प समन्वय कक्षांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व कार्यालयीन खर्चाकरीता प्रस्तावित
	एकूण प्रकल्प समन्वय कक्ष	**९८७.६७**	

अ.क्र	घटक	मागणी रक्कम	शेरा
	प्रकल्प अंमलबजावणी कक्ष – कृषि पणन		
१	बाजार समितीसाठी धान्य चाळणी यंत्र	४०.००	८ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी यंत्र प्रस्तावित
२	आठवडी बाजार आधुनिकीकरण व पायाभूत सुविधा – टप्पा १	११२५.००	५० आठवडी बाजारांमधील आधुनिकीकरण व पायाभूत सुविधा प्रस्तावित
३	आठवडी बाजारातील पर्यावरणाचे संवर्धन	५०.००	आठवडी बाजारातील पर्यावरणाचे संवर्धनाकरीता प्रस्तावित
४	वखार पावती विकास योजना	३१००.००	१०३ वखारींमध्ये पावती योजना प्रस्तावित
५	संगणीकृत लिलाव पध्दती राबविणे	३३.८३	२० कृ.उ.बा.स मध्ये संगणीकृत लिलाव पध्दती राबविणे प्रस्तावित
६	इलेक्ट्रॉनिक वजन काटे-कॅस प्रणालीला जोडणे	१८७.५०	२५ कृ.उ.बा.स मध्ये प्रस्तावित
७	महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामध्ये आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापना	३५०.००	आपत्ती व्यवस्थापन केंद्र प्रस्तावित
८	समान लेखा पध्दतीसाठी सेवा पुरवठदार	६०.००	२ सेवा पुरवठदारांचे देयक प्रस्तावित
९	कृषि उत्पन्न बाजार समितींच्यामध्ये घन कचरा व्यवस्थापन पध्दती	६५.००	अंतर्गत प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रकाशने इ. करीता प्रस्तावित
१०	वेतन व कार्यालयीन खर्च	३६८.३३	प्रकल्प अंमलबजावणी कक्षांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व कार्यालयीन खर्चाकरीता प्रस्तावित
	एकूण प्रकल्प अंमलबजावणी कक्ष – कृषि पणन	**५३७९.६६**	

अ.क्र	घटक	मागणी रक्कम	शेरा
	प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - कृषि		
१	पिक प्रात्यक्षिक - पीपीपी	३००.००	प्रकल्पाचा मुळ उद्देश साध्य करण्यासाठी व आय.सी.आर. टीमचे क्षेत्रीय पहाणीसाठी पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन
२	कृषि उद्योजकाता विकास कार्यक्रम (ई.डी.पी)	३५०.००	या बाबीकरीता जिल्हास्तरावरून मागणी असून ग्रामीण भागात उद्योजकता निमार्ण होण्याच्या दृष्टीने नव्याने ३५ ई.डी.पी प्रकल्पांचा लक्षांक प्रस्तावित
३	काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रात्यक्षिके (पीएचटी)	१६०.००	क्षेत्रीय स्तरावर या घटकाबाबत शेतकऱ्यांमध्ये कृषि उत्पादनांमध्ये प्रकल्पामुळे एफएक्यु बाबत जागरूकता निमार्ण झाल्यामुळे मागणीमध्ये वाढ
४	अभ्यास दौरे (राज्यांतर्गत व राज्य बाहेर)	८९.१०	शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक मंडळ, मॅनेजर, भाग धारक, सभासद तसेच विभागातील अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांच्यासाठी राज्याबाहेर तसेच राज्यांतर्गत अभ्यास दौरा
५	खरेदीदार विक्रेता संम्मेलन - जिल्हास्तर	६६.००	शेतक-यांच्या उत्पादित शेतमालाला पर्यायी बाजार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सदर घटक अत्यंत महत्वाचा आहे.
६	शेतकरी उत्पादक कंपन्या - टप्पा २	१२०.००	प्रकल्पामार्फत स्थापन झालेल्या उत्पादक कंपन्यांना देण्यात आलेल्या मुल्यांकन प्रपत्रानुसार, प्रकल्प टप्पा-१ मधील उत्पादक कंपन्यांचे मुल्यांकन करून प्रकल्प टप्पा-२ साठी १० शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी रू.१२०.०० लाख आर्थिक तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.
७	एफ.सी.एस.सी. सेवा पुरवठादार	५००.००	वाढीव कालावधीसाठी सेवा पुरवठादार रक्क्म

अ.क्र	घटक	मागणी रक्कम	शेरा
८	प्रशिक्षण कार्यक्रम डब्ल्यु.एच.आर.योजना	४४.८५	डब्ल्यु.एच.आर.योजनेची व्यापक प्रसिध्दीसाठी
९	वेतन व कार्यालयीन खर्च	५४४.४४	अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व कार्यालयीन खर्चाकरीता प्रस्तावित
	एकूण आत्मा	**२१७४.३९**	
	वनामती युनिट		
१	प्रशिक्षण साहित्य व मटेरीयल वनामती	५.००	प्रशिक्षण साहित्य
२	प्रशिक्षण	१६२.००	एफ.पी.सी. संचालक मंडळ व समन्वयक यांचेसाठी रामेती व सामेती स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम
३	वेतन व कार्यालयीन खर्च	१३.७५	वेतन, दैनंदिन व कार्यालयीन खर्च
	एकूण वनामती युनिट	**१८०.७५**	
	प्रकल्प अंमलबजावणी कक्ष – कृषि		
१	राज्यस्तरीय कार्यशाळा	५.००	कृषि सेवा घटकांच्या अंमलबजावणीचा आढावा
२	डॉक्युमेंनटेशनट, प्रसिध्दी, प्रोत्साहन पारितोषीक इ.	२५.००	डॉक्युमेंनटेशन, प्रसिध्दी, प्रोत्साहन पारितोषीक इ.
३	वेतन व कार्यालयीन खर्च	७५.००	वेतन, दैनंदिन व कार्यालयीन खर्च
	एकूण अंमलबजावणी कक्ष – कृषि	**१०५.००**	
	एकूण प्रकल्प अंमलबजावणी कक्ष – कृषि	**२४६०.१४**	
	प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, पशुसंवर्धन		
१	शेळी एक उच्च मुल्यवर्धीत व्यवसाय प्रात्यक्षिके	१०३.१३	सदर उपक्रमांतर्गत सातारा जिल्हयामध्ये नव्याने ७५० प्रात्यक्षिके प्रस्तावित
२	सेवा पुरवठादार - शेळी एक उच्च मुल्यवर्धीत व्यवसाय प्रात्यक्षिके	२२.५०	शेळी एक उच्च मुल्यवर्धीत व्यवसाय प्रात्यक्षिकांकरीता सेवा पुरवठादारांना द्यावयाचे मानधन

अ.क्र	घटक	मागणी रक्कम	शेरा
३	सेवा पुरवठादार - शेतकरी गटाची स्थापना (बीड व सातारा)	११.००	बीड व सातारा जिल्ह्यांमध्ये शेतकरी गटाची स्थापना करण्याकरीता सेवा पुरवठादारांना द्यावयाचे मानधन
४	महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती प्रशिक्षण	२.२०	सातारा जिल्ह्यामध्ये नवीन ४० महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती यांच्या नेमणूका व प्रशिक्षण
५	जनावरांचे आरोग्य तपासणी शिबीरे	२३.२५	सातारा जिल्ह्यामध्ये नवीन १५ जनावरांची आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन प्रस्तावित
६	वेतन व कार्यालयीन खर्च	३०.००	प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, पशुसंवर्धन येथील वेतन व कार्यालयीन खर्चाकरीता प्रस्तावित
	एकूण वाढ पशुसंवर्धन	**१९२.०८**	
	निव्वळ अतिरीक्त निधीची वाढ	**९०१९.५५**	

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४६७/१७/व्यय-२ दिनांक ०४.०१.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२३१५५१४३७७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2018.01.23 16:41:43 +05'30'

(का. गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि / पणन/पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा.राज्यमंत्री (कृषि/पणन/पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि व पणन/ पशुसंवर्धन/वित्त/नियोजन), मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
५. आयुक्त (पशुसंवर्धन), पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
७. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे
८. महासंचालक, वनामती, धरमपेठ, नागपूर
९. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
११.विभागीय कृषि सहसंचालक,पुणे
१२.जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था,पुणे
१३.उप-आयुक्त, पशुसंवर्धन,पुणे
१४.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे
१५.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१६.निवासी लेखापरीक्षा अधिकारी
१७.अवर सचिव/कक्ष अधिकारी(१७-स/रोखशाखा/२२-स),स.प.व व.विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.
१८. कक्ष अधिकारी (अर्थसं.१३/व्यय-२),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०. ०३२.
१९.निवडनस्ती (२१-स)